खरीप हंगामात (माहे जून ते सप्टेंबर) या कालावधीत वनक्षेत्रात मेंढी चराई साठी वन क्षेत्र उपलब्ध करणेबाबत..........

**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- टिआरएस-०६/२२६/प्र.क्र.१०५/वने-६**
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- २४ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय क्रमांक महसुल व वनविभाग एमएफपी-१३६५/१३२२११-Y, दिनांक ०६/१२/१९६८
२) पर्यावरण व वने आणि वन्यजीव, नवी दिल्ली यांचे राष्ट्रीय वन निती १९८८ चे क्र.३-१/८६ एफपी दिनांक ७.१२.१९८८
३) शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग, एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक २३.१२.२००३
४) शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग, एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक २१.३.२००५
५) शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग, एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक ६.५.२००८
६) शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग, एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक २.१.२०१७.
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१६/R-३/प्र.क्र.४५/G-११७८, दिनांक १८.१२.२०१८.
८) शासन पत्र महसूल व वन विभाग क्र.बैठक-२०२६/प्र.क्र.५८/समन्वय-०३ दिनांक १८.८.२०२६

<u>प्रस्तावना</u> :-

माहे जून ते सप्टेंबर हा कालखंड खरीप हंगामाचा असल्याने शेती क्षेत्र गुरे चराईसाठी पुर्णपणे बंद असते. त्यामुळे भटकंती करुन मेंढी पालन करणारे मेंढपाळ बांधव हे गावोगावी उपलब्ध असलेल्या गायरान, गुरेचरण इत्यादि क्षेत्रात किंवा वनक्षेत्रावर अवलंबून असतात. तथापि, हाच कालावधी पावसाचा असल्यामुळे वन क्षेत्रातील रोपवन, नैसर्गिक पुनर्निर्मिती (Natural regeneration), गवत उत्पादन इत्यादिशी निगडीत कामे केली जात असल्याने वनक्षेत्रात शेळी / मेंढी चराईवर निर्बंध असतात. महत्वाचे म्हणजे या कालावधीत नाशिक, धुळे, जळगांव, अहिल्यानगर, जालना, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ व वाशिम इत्यादि जिल्ह्यांमध्ये बाहेरच्या जिल्ह्यातून येणाऱ्या मेंढ्यांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य असते.

प्रचलित धोरणांनुसार वनक्षेत्रात चराई संबंधात राष्ट्रीय वननिती १९८८ मध्ये खालील निर्देश आहेत.

**४.३.४. Rights and Concessions**

४.३.४.१. The rights and concessions, including grazing, should always remain related to the carrying capacity of forests.

२. संदर्भ क्र.१ अन्वये राज्यात वनक्षेत्रातील गुरे चराई संबंधी लागू करण्यात आलेले धोरणातील शेळी व मेंढी संबंधात पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

"Grazing in forests by goats should be prohibited altogether. For sheep grazing Specified area should be set apart and separate incidence and rate of fees fixed after obtaining Government approval"

सदर चराई धोरणानुसार वन विभागातील चराई क्षेत्राचा विचार करुन शासनाच्या पूर्व मान्यतेने निर्गमित क्षेत्र मेंढी चराई करीता उपलब्ध करता येईल किंवा कसे, या प्रयोजनार्थ वर्ष २००३ च्या सुमारास प्रयत्न सुरु झाले. दिनांक २३/१२/२००३ (संदर्भ क्र.३) व त्यानंतर २१/०३/२००५ (संदर्भ क्र.४) च्या शासन निर्णयाद्वारे वनक्षेत्रात मेंढी चराई करीता सर्व समावेशक अहवाल तयार करण्यासाठी राज्यातील सर्व वन विभागांमध्ये सहाय्यक वनसंरक्षक दर्जाच्या मेंढी चराई जमाबंदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर मेंढी चराई जमाबंदी अधिकाऱ्यांनी सर्वंकष अभ्यास करुन मेंढी चराई करीता उपलब्ध असलेले व उपलब्ध नसलेले वन क्षेत्रासंदर्भात शासनास पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला होता.

**मेंढी चराईसाठी वनक्षेत्र उपलब्ध असलेले वन विभाग (एकूण २१) :-**

१. बुलढाणा २.वर्धा ३.भंडारा ४.नागपूर ५.गोंदीया ६.औरंगाबाद ७. नांदेड ८.पश्चिम धुळे ९. उत्तर धुळे १०.सिरोंचा ११.आलापल्ली १२.मध्यचांदा १३.गडचिरोली १४.वडसा १५.चंद्रपूर १६.सावंतवाडी १७.सातारा १८.कोल्हापूर १९.अकोला २०. सांगली २१. पुसद.

**मेंढी चराईसाठी वनक्षेत्र उपलब्ध नसलेले वन विभाग (एकूण २७) :-**

१. अमरावती, २.पूर्व मेळघाट, ३.पश्चिम मेळघाट, ४.उस्मानाबाद, ५.बीड, ६.परभणी, ७.अहमदनगर. ८.पूर्वनाशिक, ९. पश्चिम नाशिक,१०. सोलापूर, ११. भोर, १२.पुणे, १३. जुन्नर, १४. ठाणे, १५. जव्हार, १६.शहापूर. १७.रोहा, १८. अलिबाग, १९. डहाणू, २०. मेवासी, २१.यावल, २२. जळगाव, २३. भामरागड, २४. ब्रम्हपूरी, २५. चिपळूण, २६.यवतमाळ, २७. पांढरकवडा.

उपरोक्त अहवालावर शासनाने संदर्भ क्र.५ अन्वये शासनाने पुढील निर्देश दिले आहेत:-

1. *चराई जमाबंदी अहवाल मुंबई वन संहिता भाग ३, दिनांक ६/१२/१९६८ च्या शासन निर्णय तसेच संबंधित वन विभागाच्या कार्य आयोजनेनुसार असावे.*
2. *संरक्षित वने, वृक्षाच्छीत वन, गौण वने, चराईसाठी संरक्षित कुरणे असे क्षेत्राचे वर्ग चराईची क्षमता निश्चित करण्यात यावी.*
3. *मेंढयासाठी तरतुद करतांना सुध्दा मेंढीचा चराई युनिट १ असुन त्यानुसार मेंढी चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करुन द्यावे तसेच मुंबई वनसंहिता भाग-३ मधिल तरतुदीनुसार* ***१५ सप्टेंबर ते १५ मे पर्यंत चराईची परवानगी देण्यात यावी.***

त्यानंतर संदर्भ क्रमांक २ येथील राष्ट्रीय वननितीनुसार प्रायोगिक तत्वावर जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील पशुगणनेनुसार ३००० पेक्षा जास्त मेंढया असलेल्या तालुक्यांसाठी माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत फक्त उदर निर्वाहासाठी मेंढी चराईवर अवलंबून असणाऱ्या मेंढपाळांना first cum first serve तत्वावर मेंढी चराई परवाने उपलब्ध करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. त्या प्रयोजनार्थ परवाना शुल्क म्हणून रु.५/- प्रति मेंढी दर निर्धारीत करण्यात आला. तद्नंतर संदर्भ क्र.७ अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाने माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत वनक्षेत्रात मेंढी चराईस परवानगी देता येणार नाही, असे मत व्यक्त केले आहे. तथापि संदर्भ क्र.६ अन्वये २१ वन विभागांमध्ये मेंढी चराईकरिता माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत काही प्रमाणात वनक्षेत्र उपलब्ध करुन देऊन परवानगी देण्यात आली आहे.

राज्यातील मेंढपाळाच्या समस्येबाबत दिनांक ५.८.२०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा. मंत्री, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सदर बैठकीत मा.मंत्री (वने), महसूल विभाग, वन विभाग व पशुसंवर्धन विभागाचे सचिव व उक्त विभागांचे वरिष्ठ अधिकारी व मेंढपाळ बांधवांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपरोल्लिखीत पार्श्वभुमी तसेच वरील बैठकीतील निर्देश यांचा सांगोपांग विचार होऊन मेंढपाळ

बांधवांच्या समस्यावर उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

मेंढी चराई जमाबंदी अधिकाऱ्यांनी शासनास सादर केलेल्या अहवालानुसार वनक्षेत्रात माहे जुन ते सप्टेंबर या कालावधीत वनक्षेत्रात उपलब्ध करता होऊ शकणाऱ्या २१ वन विभागांमध्ये मेंढी चराई जमाबंदी अहवालात विनिर्दिष्ट वन क्षेत्रावर व कार्यपद्धतीने मेंढी चराई करिता परवानगी देण्यात येत आहे.

२. मेंढी चराईकरीता वनक्षेत्र उपलब्ध नसलेल्या २७ वनविभागात स्थानिक परिस्थितीचा विचार करुन काही प्रमाणात वनक्षेत्र उपलब्ध होत असेल तर त्या मर्यादेत माहे जुन ते सप्टेंबर या कालावधीत मेंढी चराई करिता परवानगी देण्यात यावी.

३. अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान क्षेत्रातील मेंढी चराईसाठी परवानगी अनुज्ञेय राहणार नाही.

४. माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत मेंढपाळांना भटकंतीमुळे त्रास होणार नाही या दृष्टीने संबंधीत जिल्हा अधिकाऱ्यांनी महसुल विभागाच्या अधिपत्याखालील, गायरान जमिन, E-class, झुडपी जमीन तसेच इतर पडीक जमीन इत्यादीद्वारे मेंढी चराईकरिता क्षेत्र उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

५. बंदीस्त आणि अर्धबंदीस्त पद्धतीने मेंढी पालन करणाऱ्यांना प्रोत्साहन प्रदान करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी राजे यशवंतराव होळकर महामेष योजना तसेच जिल्हा नियोजन समिती मार्फत संबंधीत विभागांमध्ये प्रचलित असलेल्या जिल्हास्तरीय योजनांचे अभिसरण (Convergence) करुन आवश्यक यंत्र सामग्री प्रदान करण्यासंबंधी पावले उचलावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४१८५५५६७१४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN RAJARAM MUNDHE
Date: 2026.08.24 18:56:47 +05'30'

**(प्रविण मुंढे)**
**उप सचिव (वन विभाग)**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३.
३) अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र नागपूर.
७) आयुक्त, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.
८) मुख्य वनसंरक्षक (सर्व).
९) जिल्हाधिकारी (सर्व).
१०) उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (सर्व).
११) निवडनस्ती